महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,
आकार प्रिमायसेस, दुसरा मजला,एम.एच.बी.कॉलनी,
शास्त्रीनगर, येरवडा पुणे - ४११ ००६
दूरध्वनी क्र. २०-२६०५५१८५ ई-मेल - dvjntobcsbcwpune@gmail.com

क्रमांक २०२५ इमावबकसं/शा.व.स्वं.आ./वेळापत्रक/२०२५-२६/कावि-८८०/४२२६ दि. १४.८.२०२५

प्रति,

१. प्रादेशिक उपसंचालक (सर्व),
२. सहायक संचालक (सर्व),
इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**विषय :- राज्यातील इतर मागासवर्ग , विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह , ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.२०२५/इमावबकसं/शा.व.स्वं.आ./वेळापत्रक/२०२५-२६/कावि-८८०/३८७३ दि.३०.७.२०२५

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्रान्वये राज्यातील इतर मागासवर्ग ,विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह , ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकास मान्यता देणेत आली होती.तथापी वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज करावयाच्या कालावधीमध्ये वाढ करणेची विद्यार्थ्यांची मागणी झाल्याने सदर प्रवेशप्रक्रियेसाठी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.तसेच संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये देण्यात आलेले निर्देश सदर वेळापत्रकासाठी लागू राहतील.

करिता आपणास सुचित करण्यात येते की , शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन , संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे राज्यातील इतर मागासवर्ग , विमुक्त जाती , भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह , ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत सोबत जोडण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश प्रक्रियेबाबत योग्य ती कार्यवाही अनुसरावी.

(सोनाली मुळे,भा.प्र.से)
संचालक
इतर मागास बहुजन कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :-**

मा.सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना सविनय सादर

२७२

CS CamScanner

## शासकीय वसतीगृहाचे सन २०२५-२०२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | अर्ज छाननी करावयाचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिध्द करणे | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशांची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी. अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) | दिनांक १७.८.२०२५ ते २७.८.२०२५ | दिनांक २८.८.२०२५ ते २.९.२०२५ | दिनांक ३.९.२०२५ | दिनांक १२.९.२०२५ | दिनांक १५.९.२०२५ | दिनांक २३.९.२०२५ |

(सोनाली मुळे,भा.प्र.से)
संचालक
इतर मागास बहुजन कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे

CamScanner